## दै. आकर्षण निवडक

### राज्यस्तरीय स्वतंत्र तबला वादन स्पर्धेत जय गांधी याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक



अहिल्यानगर- शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन व आय लव्ह नगर प्रायोजित आणि अनाहत एक कलासृष्टी आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत स्वतंत्र तबला वादन मध्ये जय संजय गांधी याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे नरेंद्र फिरोदिया व गुरू शेखर दरवडे यांच्या हस्ते जय संजय गांधी याचा ११ हजार रुपये रोख आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अशोक गांधी (जरीवाला), अनाहतचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी, विलास बडवे, डॉ. निरज करंदीकर, परीक्षक सुजित काळे (नाशिक), प्रशांत गाजरे (नांदेड) आदी उपस्थित होते. या स्पर्धेत लातूर, अंबरनाथ, बारामती, पनवेल, नांदेड, रायगडसह राज्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. स्वतंत्र तबला वादन मध्ये गांधी याने १२ मिनिटे सुंदर वादन केले. त्याने यापूर्वीही विविध स्पर्धेत उत्कृष्ट तबला वादनासाठी बक्षिसे मिळवली आहेत. जयने विशारद पूर्ण केले आहे. सध्या तो सोलो व साथ संगतचा अभ्यास व सराव करत आहे. जय हा संजय गांधी (वाळवणेकर) यांचा मुलगा तर तबला वादक अजित गुंदेचा यांचा भाचा आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### सौंदाळा ग्रामपंचायतीचा भारतीय संविधानाची प्रत देऊन गौरव



अहिल्यानगर- भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेल्या सामाजिक समतेच्या दिशेने नेवासा तालुक्यातील मौजे सौंदाळा ग्रामपंचायतीने ''जातमुक्त'' ठराव घेतल्याबद्दल शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम सामाजिक विचारमंचाच्या वतीने ग्रामपंचायतीचा विशेष गौरव करण्यात आला. सामनगावच्या माजी सरपंच मीनाक्षी कांबळे यांच्या हस्ते सरपंच शरद आरगडे, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आरगडे, भिवसेन गरड, सचिन आरगडे, लक्ष्मण आरगडे, बाळासाहेब आरगडे, भाऊसाहेब आरगडे तसेच ग्रामपंचायत सदस्यांचा भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विचारमंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, आरोग्य सेविका शालनताई जाधव, महिला अध्यक्षा उषाताई शिंदे, मिलिंद कांबळे, गणेश ढोबळे, सुनील सकट, युनूस पठाण, मोहम्मद पठाण, अर्शद पठाण, अमोल आहेर आदी मान्यवर उपस्थित होते. अशोक शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सौंदाळा ग्रामस्थांनी गावात कुणाच्याही जातीचा उल्लेख करायचा नाही व जात मानायची नाही, फक्त ''माणूस'' हीच जात मानायची, असा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. हा ठराव केवळ गावापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. यापूर्वीही गावाने अनेक सामाजिक सुधारणा राबवल्या आहेत. गावात ''शिवी देणे बंदी''चा ठराव संमत करून शिवी देणाऱ्या व्यक्तीस दंडाची तरतूद करण्यात आली आहे. निराधार ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन वेळच्या जेवणाची सोय करण्यात आली आहे. तसेच मुलींच्या विवाहासाठी ग्रामपंचायतीमार्फत निश्चित आर्थिक मदत देण्याची योजना कार्यान्वित आहे. अशा अनेक लोकहितवादी आणि प्रगत नियमांचे काटेकोर पालन संपूर्ण गाव करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सरपंच मीनाक्षी कांबळे म्हणाल्या की, देशाचे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान निर्मितीच्या वेळी जात-धर्मापेक्षा राष्ट्रीयत्वाची भावना श्रेष्ठ मानण्याचा संदेश दिला होता. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानंतरही आपण जाती-धर्माच्या बंधनात अडकून राहिलो आहोत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र सौंदाळा ग्रामपंचायतीने स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर जातबंदीचा ठराव घेऊन संविधानाला पूरक असे कार्य केले आहे. हा निर्णय खऱ्या अर्थाने सामाजिक ऐक्य आणि बंधुतेचा संदेश देणारा असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

# सारडा महाविद्यालयाचा अनोखा उपक्रम मराठी भाषा गौरव दिनी लोकसंस्कृतीच्या उपासकांचा सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालय येथे मराठी विभाग व संशोधन केंद्रात मराठी भाषा गौरव दिन ''लोककलावंतांच्या, लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून,त्यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.लोककला या समाजाचा सांस्कृतिक वारसा,परंपरा आणि सामाजिक अस्मिता दर्शवतात. लोककला या समाजाचे प्रतिबिंब असल्याने त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. जागतीकीकरणाच्या युगात लोककला ही विविधतेची साक्ष देते.आणि मानवी सर्जनशीलतेचे प्रदर्शन करते. हे लोककलेचे महत्त्व मराठी भाषा गौरव दिनाच्या दिवशी लोक कलावंतांच्या प्रत्यक्ष सादरीकरणातून ठळकपणे मांडले गेले.

कोपरगाव येथील छबुराव सुपेकर हे लोकपरंपरेतील पारंपरिक वासुदेव.या लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या कलेचा जागर मराठी भाषा गौरव दिना च्या निमित्ताने करण्यात आला.

लोककलेचे अभ्यासक भगवान राऊत यांनी वासुदेव या लोकसंस्कृतीच्या उपासकाची व त्यांच्या लोककलेबद्दलची माहिती प्रत्यक्ष सादरीकरणातून विद्यार्थ्यांना सांगितली. हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, कार्याध्यक्ष आणि पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर,हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ.माहेश्वरी गावित होत्या.डॉ.गावित यांच्या नेतृत्वात महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. अध्यक्षीय भाषणात गावित म्हणाल्या,''बदललेल्या परिस्थितीत भाषेच्या संवर्धनासाठी जसे शासकीय पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे,तेवढेच जनतेनेही सहभाग दाखविणे गरजेचे आहे.मराठी भाषेत सकस संशोधन व्हावे.यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.काळाचे भान ठेवून मराठीचा अभ्यास जास्तीत जास्त व्यवहारोपयोगी करणेही आवश्यक आहे.समृद्ध अशा बोलींना टिकविणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.लोककला म्हणून उल्लेखित होणाऱ्या अनेक परंपरा लोकजीवन सारणीत आढळतात.लोककला हा सांस्कृतिक ठेवा आहे.तो जतन आणि संवर्धित करणे महत्त्वाचे आहे. जागतिक मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने पारंपरिक वेशभूषा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.लोककलावंतांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.संगीता शेळके यांनी केले.तर आभारप्रदर्शन प्रा.डॉ.प्रतीक्षा गायकवाड यांनी केले. प्रा.डॉ.दया जेठे, प्रा.डॉ.प्रकाश जाधव, प्रा.अर्चना क्षीरसागर, उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे,प्रबंधक अशोक असेरी यांच्यासह प्राध्यापक,प्राध्यापकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाला लाभला.

# शेतकऱ्यांच्या भावना भडकवून राजकीय खेळी करु नका – आमदार काशिनाथ दाते सर

## ५ मार्चपर्यंत कुकडीचे आवर्तन सुटणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा डावा कालव्याच्या आवर्तनाबाबत काही घटकांकडून जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून शेतकऱ्यांच्या भावनांना चिथावणी देण्याचा प्रयत्न सुरू असल्याची खंत व्यक्त करत आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकरी बांधवांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या पाण्याच्या प्रश्नाला राजकीय रंग देत स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा डाव उधळून लावा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार दाते सर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन कुकडी व पिंपळगाव जोगा कालव्याचे आवर्तन तातडीने सोडण्याची मागणी केली होती.

त्यांच्या पाठपुराव्या- नंतर मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेबांमार्फत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून कुकडी कालव्याद्वारे ५ मार्च दरम्यान तर २५ फेब्रुवारी ते १ मार्च च्या दरम्यान पिंपळगाव कालव्यांद्वारे पाणी सोडण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही वेळेत आवर्तन सोडण्यात आले असल्याचे नमूद करत त्यांनी शेतकऱ्यांनी अफवांना बळी न पडता प्रशासनावर विश्वास ठेवावा, असे आवाहन केले. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असून कोणत्याही परिस्थितीत त्यांना न्याय मिळवून देण्याची आपली बांधिलकी कायम राहील, अशी ग्वाहीही आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली.

> **येडगाव धरणातील अपेक्षित पाणीसाठा, तांत्रिक बाबी आणि सर्व लाभक्षेत्रांचा विचार करूनच आवर्तनाचे नियोजन केले जाते. दोन-तीन दिवसांचा विलंब तांत्रिक कारणास्तव होऊ शकतो; मात्र ५ मार्चपर्यंत पाणी निश्चितपणे उपलब्ध होईल, यावर कोणीही राजकारण करू नका.**
>
> **आमदार काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

राज्यस्तरीय कथाकार कै. शंकर पाटील साहित्य पुरस्कार

# कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना जाहीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोल्हापूर कवी सरकार स्वाभिमानी वाचनालयाच्या वतीने जाहीर झालेल्या राज्यस्तरीय पुरस्कारात अहिल्यानगर येथील कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना राज्यस्तरीय कथाकार कै. शंकर पाटील साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

मराठी गौरव दिनाच्या निमित्ताने सातारा येथे भरलेल्या २७ व्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनात, संमेलनाध्यक्ष मा राजेंद्र फंड, प्रसिद्ध कादंबरीकार श्रीकांत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शिवाजी शिंदे, ज्येष्ठ कवी श्री विलास पाटील, ज्येष्ठ समाजसेविका सौ. सुमन देसाई मुंबई यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्राच्या विविध भागातील सर्व साहित्यिक,कवी हजर होते. सदर साहित्य संमेलनमध्ये श्री बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन कार्यक्रम देखील सादर झाला.

बाळासाहेब देशमुख यांनी साहित्य क्षेत्रात प्रासंगिका, वात्रटिका ,ललित लेखन , कथालेखन असा साहित्य क्षेत्रात विपूल लेखन केलेले आहे. त्यांचा रंग माझा वेगळा हा कथासंग्रह ,अखिल भारतीय साहित्य महामंडळ अध्यक्ष मा मिलिंद जोशी यांच्या शुभहस्ते प्रकाशित झालेला आहे . त्यांचा दुसरा कथासंग्रह माणसं अशी.. अन् तशीही.. परमहंस प्रकाशन अमरावती या प्रकाशन संस्थे द्वारे झाला आहे. या कथासंग्रहास इतिहास अभ्यासक मा नवनाथ वाव्हळ, व ज्येष्ठ कादंबरीकार श्रीकांत पाटील कोल्हापूर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. या पुरस्काराबद्दल बाळासाहेब देशमुख यांचे साहित्यिक वर्तुळातून अभिनंदन होत आहे.

# हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## ३०० विदयार्थ्यांचा सहभाग । ऑपरेशन सिंदूर, बळीराजाची व्यथा,शेतकरी नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा बागडपट्टी विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांचे अध्यक्षतेखाली उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांचे हस्ते संपन्न झाले.

स्नेहसंमेलन प्रसंगी इयत्ता चौथी मधील कु.अर्णवी कांबळे व कु. गायत्री गायकवाड यांनी उपमुख्यकार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ व उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांची मुलाखत घेत अहिल्यानगर शहरा बाबत त्यांचे व्हिजन जाणून घेतले.स्वच्छ व ग्रीन सीटी असे व्हिजन घेऊन भविष्य काळात काम होईल. असे उपमहापौर धनंजय जाधव यांनी सांगितले.याप्रसंगी शाळेचे चेअरमन



मधुसूदन सारडा यांनी सन २०२५-२६ चा शैक्षणिक अहवाल सादर केला.तर संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनी विदयार्थ्यांच्या कलागुनांना वाव देणारी शाळा म्हणून गौरवोद्गार काढले.

बालवाडी पासून चौथी पर्यंतच्या ३०० विदयार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमात सहभागी होत ऑपरेशन सिंदूर, बळीराजाची व्यथा,शेतकरी नृत्य,देशभक्ती पर गिते, लाकनृत्य सादर केली.शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी प्रास्ताविक केले.तर सौ. ब्रम्हे गौरी यांनी सुत्रसंचलन केले. वार्षिक क्रिडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण सन्माननीय अतिथींच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी शालेय समिती सदस्य रविंद्र गुजराती,दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले यांची उपस्थिती होती.

# टेलिस्कोपमधून आकाशदर्शनाचा थरार; राष्ट्रीय विज्ञान दिनी विद्यार्थ्यांना प्रेरणेची नवी दिशा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून तसेच

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर येथे विज्ञानप्रेमी वातावरणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कौशल्य विकास, जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा संगम घडवणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. विशेष आकर्षण ठरले ते टेलिस्कोपच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना घडवून आणलेले प्रत्यक्ष आकाशदर्शन. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य खालिद जाहागीरदार होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी व खगोल अभ्यासक दत्ता देवगावकर, सनफार्मा कंपनीचे माजी व्यवस्थापकीय संचालक सुभाष पाडगावकर तसेच खगोल अभ्यासक व टेलिस्कोप तज्ञ पंकज वैद्य उपस्थित होते.

देवगावकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विज्ञान म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक नसून प्रयोगशीलता आणि कौशल्य विकसित करण्याचा मार्ग असल्याचे सांगितले. ''प्रश्न विचारण्याची सवय लावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा,'' असे आवाहन त्यांनी केले.

पाडगावकर यांनी विविध शास्त्रज्ञांच्या उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या संशोधक वृत्तीला चालना दिली. ''विचार करा, प्रश्न विचारा आणि शोध घ्या,'' हा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांना प्रेरक ठरला.

वैद्य यांनी टेलिस्कोपच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना सूर्यावरील काळे डाग (सनस्पॉट्स) प्रत्यक्ष दाखवत खगोलशास्त्रातील रंजक माहिती समजावून सांगितली. प्रथमच टेलिस्कोपमधून सूर्य निरीक्षणाचा अनुभव घेताना विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण होते.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६ सह विज्ञान सप्ताहाचा प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** २८फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरात विविध विज्ञान उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित करून राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. या वर्षीच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची थीम ''विज्ञानातील महिला: उत्प्रेरक विकसित भारत'' अशी आहे. सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये, विज्ञान सप्ताहाच्या कार्यक्रमांमध्ये मध्ये इयत्ता सहावीआणि सातवी विद्यार्थ्यांसाठी श्रीमती प्रियांका मंगलराप यांच्या मार्गदर्शनाखाली

विज्ञान प्रदर्शन ( प्रकल्प )स्पर्धा यासारख्या विविध उपक्रमांचा समावेश होता, जिथे अंदाजे १०० प्रकल्पांना परीक्षक *श्रीमती इशरत मोईन शेख* आणि *श्रीमती अमरिंदर कौर* यांनी परीक्षण केले. विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि विज्ञान उपकरणे प्रदर्शनात ठेवण्यात आली होती.

ती उपकरणे वैज्ञानिक संकल्पनांची समज अधोरेखित करत होती . विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व विज्ञान विकसित होण्यासाठी, इयत्ता आठवी आणि नववी साठी एकूण चार गटांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्याचे नेतृत्व प्राचार्य *कु. गीता तांबे* यांच्या



मार्गदर्शनाखाली विज्ञान शिक्षिका *सौ. इशरत शेख* आणि *सौ. तस्नीम सैफी* यांनी केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसला, ज्यांनी त्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाची चाचणी घेतली. आनंदऋषी रक्तपेढीला इयत्ता ८ वी आणि ९ वी साठी क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या क्षेत्रभेटीसाठी आनंद ऋषी ब्लड बँकचे प्रमुख सुनील महानोर यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.या सोहळ्यात विज्ञानविषय विद्यार्थी प्रतिनिधी ऋतुजा भोंडे आणि कृष्णा खराडे यांची नामवंत शास्त्रज्ञांची भाषणे, वैज्ञानिक उपकरणांचे प्रदर्शन आणि संवादात्मक सत्रांचाही समावेश होता. या कार्यक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानात करिअर करण्यासाठी प्रेरित करणे, तसेच वैज्ञानिक स्वभाव आणि जिज्ञासा वाढवणे. राष्ट्रीय विज्ञान दिन साजरे करणे हे भारतातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे आणि विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र येऊन विज्ञानाचे प्रयोग साजरे करतात हे पाहणे आनंददायी होते.तसेच विज्ञान विषयावर आधारित चार गटांच्या विभाजनाप्रमाणे प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात आले होते त्यापैकी ने प्रथम क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना शिक्षिका सुमन कदम व आशा रंगलानी यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. द्वितीय क्रमांक ग्रुपच्या विद्यार्थ्यांना मिळाला. या विद्यार्थ्यांना शिक्षिका प्रियंका मंगलारप व वैशाली शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ कांचन पापडेजा व सौ .करिष्मा नवलानी **उपस्थित होत्या .विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल**

माध्यमिकच्या प्राचार्या गीता तांबे मॅडम व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा व सौ.करिष्मा नवलानी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले . संस्थेचे अध्यक्ष श्री.राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोदर माखिजा विश्वस्त श्री. महेश मध्यान श्री. सुरेश हिरानंदानी , श्री. राजकुमार गुरुनानी श्री. हरेश मध्यान यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सीए परीक्षेत यश मुथाचे सुयश



अहिल्यानगर - येथील विक्रांत मुथा यांचे चिरंजीव यश मुथा याने सीए परीक्षेत सुयश प्राप्त केले आहे. याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रमेश गुंदेचा, सुरेश मुनोत, मनोज मुनोत, आनंद मुथा, पारस गुंदेचा, विक्रांत मुथा आदी उपस्थित होते.


### कर्ज वसुली ही कला; कायदा, समजूत आणि तडजोड यांची त्रिसूत्री महत्त्वाची - नवनाथ जगताप



अहिल्यानगर - कर्ज वसुली ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून ती एक कला आहे. कायद्याचे शस्त्र हातात ठेवून, समोरच्या व्यक्तीची परिस्थिती व भावना समजून घेत आणि आवश्यकतेनुसार तडजोडीची भूमिका स्वीकारत वसुली केल्यास अधिक परिणामकारक यश मिळते, असे प्रतिपादन बारामती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी नवनाथ जगताप यांनी केले. अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने मार्च एण्डच्या पार्श्वभूमीवर कर्जदारांकडून सामंजस्याच्या भूमिकेतून प्रभावी कर्ज वसुली व्हावी यासाठी 'कर्जवसुली व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जगताप बोलत होते.कार्यक्रमाचे उद्घाटन कोपरगाव पीपल्स बँकेचे चेअरमन सुनील बंब यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा, व्हाइस चेअरमन शिवाजीराव व्यवहारे, अंबिका महिला बँकेच्या संचालिका आशाताई मिस्कील, संध्याताई जाधव तसेच जिल्ह्यातील विविध नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे आपल्या मार्गदर्शनात नवनाथ जगताप यांनी कर्जदारांचे तीन प्रकार स्पष्ट केले. क्षमता आहे, पण इच्छा नाही अशा कर्जदारांना कायद्याचा धाक दाखवून कर्जफेडीची मानसिकता तयार करावी लागते. इच्छा आहे, पण क्षमता नाही हे कर्जदार अडचणीत आलेले असतात. त्यांची परिस्थिती समजून तडजोडीची भूमिका घ्यावी लागते. ना इच्छा, ना क्षमता अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर प्रक्रिया, जप्ती आणि लिलाव करून वसुली करावी लागते. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत सहकारी बँकांना कर्ज वसुलीसाठी प्रभावी अधिकार प्राप्त झाले आहेत. या कायद्यातील तरतुदींचा योग्य वापर केल्यास बँकांची थकबाकी कमी होण्यास मदत होते. जमीनदार व महसूल प्रशासनाच्या माध्यमातूनही चांगली वसुली साधता येते. मात्र, वसुली करताना समोरच्या व्यक्तीच्या भावना व परिस्थिती लक्षात घेतल्यास प्रक्रिया अधिक सुलभ होते, असे त्यांनी नमूद केले. असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ''मार्च एण्ड हा बँकिंग क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ असतो. थकबाकी कमी करणे, आर्थिक शिस्त राखणे आणि बँकेचा ताळेबंद मजबूत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.मात्र कर्ज वसुली करताना कर्जदार आणि वसुली अधिकारी यांच्यातील वाद विकोपाला जाऊ नयेत, यासाठी शिस्तबद्ध, संवेदनशील आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक वातावरणात सहकारी बँकांनी व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे.

### हन्नान शेख याचा रमजानचा रोजा

अहिल्यानगर - हन्नान ओवेस शेख याने पवित्र



रमजानचा पहिला रोजा धरला. तो इंग्रजी शाळेत इयत्ता पहिलीत शिकत आहे. अवघ्या सहा वर्षाचा तो असून, अभ्यासात व खेळातही पहिला येतो. त्याचे समाजातून कौतूक करण्यात येत आहे. तो पत्रकार सरवर तांबटकर यांचा नातू आहे.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सांस्कृतिक कार्यक्रमातून 'नारीशक्ती'चा जागर; पर्यावरण व पाणी प्रश्नावर प्रभावी संदेश**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून स्त्री शक्तीचे दर्शन घडविले. पर्यावरण व पाणी प्रश्नावर गीत व नाटिकेद्वारे जागृती केली. गरबा नृत्य, आदिवासी नृत्य आणि महाराष्ट्रासह दक्षिण भारतातील पारंपारिक गीतांवर नृत्याचे सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्धाटन कर्मवीर भाऊराव व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठविधीज्ञ ॲड. विक्रम वाडेकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, स्कूल कमिटी सदस्य अंबादास गारुडकर, सल्लागार समिती सदस्य माजी प्राचार्य शिवाजीराव भोर, विष्णुपंत म्हस्के, शामराव व्यवहारे, विश्वासराव काळे, माजी सहसचिव तथा जनरल बॉडी सदस्य डॉ. के.एच. शिंदे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांनी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. याशिवाय कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना चालना देण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाहुण्यांचे स्वागत ज्येष्ठ शिक्षक महादेव भद्रे यांनी केले.

ॲड. विक्रम वाडेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मोबाईल हे मारक ठरत आहे.

# पेमराज सारडा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे सी. ए.परीक्षेत घवघवीत यश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील एम.कॉम.द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी पूजा सुहास ठावरे हिने चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

सी.ए.सारखी कठीण व स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण करत पूजाने जिद्द,चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे उल्लेखनीय यश मिळवले आहे.तिच्या या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.असून वाणिज्य विभागासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. तिचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. तिला वाणिज्य विभागातील डॉ.प्रिया सारडा,डॉ. निर्मला चौधरी,प्रा. साक्षी अरोरा,प्रा.वीरेंद्र पाटील,प्रा. ओंकार भिंगारदिवे तसेच इतर प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते पूजा चा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे तसेच प्रबंधक अशोक असेरी आदी उपस्थित होते.यावेळी प्राचार्य डॉ.गावित म्हणाले,''कष्टाला यशाची जोड मिळते,याचे उत्तम उदाहरण म्हणजे पूजा ठावरे.''

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ.रमेश झरकर तसेच कनिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी पूजाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पूजा ठावरे हिच्या या यशामुळे पेमराज सारडा महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून,तिच्या भावी कारकिर्दीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# प्रत्येकाने समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न करावा– शुभम गुंदेचा

**जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रत्येक व्यक्तीची प्रगती त्याच्या कष्टामुळे होते. त्याच बरोबर त्यात समाजाचाही वाटा असतो. त्यामुळे आपण समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. दिनदुबळ्यांची, वंचितांची सेवा हीच ईश्वर सेवा असते ही शिकवण साधूसंत देत असतात. आपल्या मदतीमुळे एखाद्या गरजूच्या जीवनात आनंद फुलत असेल तर त्यापेक्षा दुसरे समाधान नाही. जैन वात्सल्य संस्था अनेक वर्षांपासून समाजातील गरजूंना मदतीचा हात देऊन त्यांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

या उपक्रमात सहभागी होणे खरंच खूप आनंद देणारे आहे, अशा भावना शुभम गुंदेचा यांनी व्यक्त केल्या. नगरमधील जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा, अन्नधान्य दिले जाते. यावेळी कांतीलाल नवलमल गुंदेचा यांची धर्मपत्नी स्व. इमरतबाई कांतीलालजी गुंदेचा यांचे स्मरणार्थ किराणा दिला. याप्रसंगी शुभम महेश गुंदेचा, तनिष्का महेश गुंदेचा, वात्सल्य संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा, ईश्वर बोरा, मुलचंद डागा, सचिन कोठारी, सेक्रेटरी विजय गुगळे आदी उपस्थित होते.

बाबुशेठ बोरा प्रास्ताविकात म्हणाले की, जैन वात्सल्य संस्थेच्या नावातच वात्सल्य असल्याने दर महिन्याला निरपेक्ष भावनेने गरजूंना मदत केली जाते. साधूसंतांना अभिप्रेत समाज सेवा करण्याचा प्रयत्न असतो. यात समाजातील अनेक दानशूर उत्स्फूर्तपणे योगदान देत असतात. कांतीलाल गुंदेचा परिवार अतिशय धार्मिक आणि समाजासाठी योगदान देणारा आहे. अशा सहकार्यामुळेच संस्थेला निरंतर हा उपक्रम राबविण्यात यश आले आहे. शेवटी सचिन कोठारी यांनी आभार मानले.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप पदाधिकारी नियोजन बैठक पार

**कार्यकर्त्यांकडून युवा नेते अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीची जोरदार मागणी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक आज बुर्हानगर येथे संपन्न झाली. या बैठकीत भाजपचे संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे यांनी कार्यकर्त्यांना दिशा देत सांगितले की, ही निवडणूक फक्त राजकीय नाही, तर श्रद्धेची आणि वारशाची लढाई आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे कार्य, त्यांचा जनसंपर्क आणि जनतेतील नाळ आजही जिवंत आहे. त्यांना खरी श्रद्धांजली म्हणजे आपला उमेदवार एक लाख मतांच्या फरकाने विजयी करणे! रवींद्र अनासपुरे पुढे म्हणाले, राहुरी, पाथर्डी आणि नगर तालुक्यांमध्ये आपल्याला मते वाढवायची आहेत.

गेल्या लोकसभा निवडणुकीत आपण थोडे मागे राहिलो, पण आता ती चूक पुन्हा होऊ देऊ नका. प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जाऊन मतदारांशी संवाद साधावा, मतदार यादींचा सखोल अभ्यास करावा. ते पुढे म्हणाले, स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांचा वारसा म्हणजे जनतेच्या हृदयात वसलेली माणुसकी आणि कार्यसंस्कृती.

त्या वारशाचा खरा वारसदार म्हणजे युवा नेते अक्षय कर्डिले आहेत.



ते अभ्यासू, कर्तृत्ववान आणि जनतेत स्वीकारार्ह आहेत. या बैठकीत बोलताना अक्षय कर्डिले यांनी भाषणात म्हटलं की, राहुरी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाशी माझे नाते हे केवळ राजकीय नाही, तर कौटुंबिक आहे. माझे वडील नसताना माझ्या राजकीय प्रवासाची सुरुवात होईल असं मी कधीच विचार केला नव्हता.

पण कार्यकर्त्यांनी दाखवलेले प्रेम आणि विश्वास मला नव्याने बळ देत आहे. ते पुढे म्हणाले, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी आम्हाला शिकवले की निवडणूक कधीच हलक्यात घेऊ नये. कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि एकजुटीने काम करावे.

गेल्या चार महिन्यांपासून मी जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत आहे. जनतेने वडिलांवर केलेलं प्रेम आज माझ्यावरही करत आहे, हीच आमच्यासाठी खरी ताकद आहे. अक्षय कर्डिले यांनी सांगितले की, ही निवडणूक आपण संघटितपणे लढवायची आहे, आणि विजय निश्चित आहे. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या ३० वर्षांच्या कार्याची पावती या निकालातून मिळेल. बैठकीदरम्यान उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीची मागणी केली आणि त्यांना विजयी करण्याची ग्वाही दिली.

या बैठकीस संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, अक्षय कर्डिले, जिल्हाध्यक्ष दिलीप बालसिंग, शहराध्यक्ष अनिल मोहिते, भाऊसाहेब बोठे, काशिनाथ लवांडे, बाजीराव गवारे, बाळासाहेब अकोलकर, संभाजी पालवे, संदीप कर्डिले, अर्जुन

# महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी अविनाश घुले यांची निवड

**पुण्यातील राज्य कार्यकारिणी बैठकीत घोषणा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ चे अध्यक्ष स्वर्गीय बाबा आढाव यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदाच्या जागेवर पुणे येथे महामंडळाची राज्य कार्यकारिणी बैठक पार पडली. या बैठकीत अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांची राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. स्व. आढाव यांच्या स्मृतींना अभिवादन करून बैठकीस प्रारंभ करण्यात आला.

बैठकीत अध्यक्षपदी विदर्भातील डॉ. बाबा आढाव यांचे निकटचे सहकारी डॉ. हरीश धुरट यांची निवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष अविनाश घुले यांच्यासह बेठकीस राजकुमार घायाळ (बीड) विकास मगदूम (सांगली) हुसेन पठाण (पुणे), आप्पा खताळ (धुळे) शिवाजीराव शिंदे (सोलापूर) हनुमंत बहिरट (पुणे) शेख हसन कादरी (अकोला), गंगाराम कोळेकर (धुळे), कृष्णा चौगुले (कोल्हापूर), गोरख मेंगडे (पुणे) सूर्यकांत स्वामी (नांदेड) आदीं राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते तसेच यावेळी जिल्हा हमाल पंचायतीचे उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे तसेच माथाडी पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले आदी उपस्थित होते.

नवीन उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर अविनाश घुले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, स्वर्गीय डॉ बाबा आढाव यांच्या जाण्याने माथाडी व हमाल कामगार चळवळीमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी आयुष्यभर कष्टकरी वर्गाच्या हक्कांसाठी झटत असताना अन्यायाविरोधात निर्भीड भूमिका घेतली. त्यांच्या विचारांचा आणि संघर्षाचा वारसा जपण्याची जबाबदारी आता आमच्या सर्व पदाधिकाऱ्यांवर आली आहे. राज्यभरातील हमाल–माथाडी कामगारांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांवर प्रभावी लढा उभारण्याचा आमचा निर्धार आहे.

घुले पुढे म्हणाले की, कामगारांच्या वेतनवाढीपासून सामाजिक सुरक्षा, आरोग्य सुविधा, निवृत्ती वेतन आणि कामाच्या ठिकाणी सन्मान या सर्वच मुद्द्यांवर ठोस धोरण राबविणे आवश्यक आहे. जेथे जेथे कष्टकऱ्यांवर अन्याय होईल तेथे तेथे महामंडळाचा आवाज ठामपणे पोहोचवला जाईल. शासनदरबारी प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघटित प्रयत्न करण्यात येतील. स्व. बाबा आढाव यांनी उभी केलेली लढाऊ परंपरा अखंडित ठेवत कामगारांच्या हितासाठी नवे उपक्रम राबविण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# कर्जुले हर्या येथिल महादेव सुवर्ण महोत्सवाची सांगता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील वासुंदे व कर्जुले हर्या गावांच्या हद्दीवरील भेडसावस्ती येथे भगवान श्री महादेव महाराज सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित तिनदिवसीय सप्ताहाच्या सांगता समारंभास आमदार काशिनाथ दाते सरांनी उपस्थित राहून हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांच्या कीर्तनाचा लाभ घेतला.

या प्रसंगी स्थानिक नागरिकांनी महादेव मंदिरासमोर सभामंडप उभारण्याची मागणी आमदार दाते यांच्याकडे केली. त्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, ''भेडसावस्तीवरील तरुणांनी शिस्त व संस्कार जपत आपल्या आजोबांनी सुरू केलेला एक दिवसीय उत्सव आज पन्नास वर्षांनंतरही तिनदिवसीय सप्ताहाच्या रूपात यशस्वीपणे टिकवून ठेवला आहे. वावीकर महाराजांनी कीर्तनात उल्लेख केल्याप्रमाणे शताब्दी वर्षही नक्कीच साजरे होईल.''

सभामंडपासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यास चालू आर्थिक वर्षातच काम पूर्ण करून देण्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सभापती असताना कर्जुले हर्या गावासाठी ७ कोटी रुपयांहून अधिक विकासकामे मार्गी लावल्याचे त्यांनी नमूद केले.

''मला आमदार करण्यात ज्यांचे योगदान आहे, ते मी कधीही नाकारले नाही. कन्हेरसारख्या छोट्या गावातील सर्वसामान्य कुटुंबात जन्म झाल्याने जनतेच्या अडचणींची जाणीव मला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या कामासाठी मी कधीही कमी पडणार नाही,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास राष्ट्रवादी कार्याध्यक्ष पंढरीनाथ उंडे, माजी सरपंच साहेबराव दादा वाफारे, माजी सरपंच संजीवनी ताई आंधळे, माजी सरपंच बाळशिराम भाऊ आंधळे, एकनाथ दाते सर, माऊली शिंदे, अनंता शिर्के, रामदास आंधळे, अशोक कोकाटे, अशोक आंधळे, भीमराज आंधळे (मेजर), निवृत्ती शिर्के, सुदाम आंधळे, रामदास उंडे, सुभाष आंधळे, किसन झावरे, गजानन झावरे, मुरलीधर उंडे, दादाभाऊ उंडे, अंबादास उंडे, गोरक्ष उंडे, मच्छिंद्र उंडे, राजेंद्र उंडे, नानाभाऊ उंडे, भाऊसाहेब उंडे, बाळासाहेब उंडे, उत्तम उंडे, सिद्धार्थ उंडे, परशुराम उंडे तसेच हर हर महादेव मित्र मंडळ भेडसे वस्ती आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तीभाव, परंपरा आणि विकासाचा संदेश देणारा हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

**''आमदार दाते सर हे शांत व संयमी नेतृत्व आहे. त्यांच्यावर रंगदास स्वामींची कृपा असल्यानेच ते आमदार पदापर्यंत पोहोचले आहेत, समाजातील सर्व स्तरातील घटकांना विचारात घेऊन त्यांनी केलेले सामाजिक कार्य हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे वैशिष्ट्य आहे.**

**हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर**







# नगर शहरात धुलीवंदन उत्साहात; बालगोपाळांचा रंग, होळीतील धूळ, राख आणि मैत्रीचा अनोखा संगम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात आज धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सावेडी येथील श्रमिकनगर भागात तसेच दातरंगे मळा येथील श्री एकदंत कॉलनी परिसरात बालगोपाळांनी रंगांची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला. सकाळपासूनच लहान मुला-मुलींनी एकत्र येत रंग, पाणी, होळीची राख आणि धूळ लावून पारंपरिक पद्धतीने धुलीवंदन खेळले. परिसरात ''होळी रे होळी''च्या जल्लोषात वातावरण रंगून गेले होते.

यावेळी बालगोपाळांनी आपल्या मित्र-मैत्रिणींना रंग भरवत, होळीतील पवित्र राख कपाळी लावत आणि माती लावून एकमेकांतील प्रेम, आपुलकी आणि मैत्रीचे नाते अधिक दृढ केले. कुणी गुलाल उधळत होते, तर कुणी पारंपरिक पद्धतीने धूळ लावून आनंद व्यक्त करत होते. लहानग्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि रंगांनी नटलेले अंगण पाहून पालकांनाही बालपणाच्या आठवणी ताज्या झाल्या.

धुलीवंदन हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. होळीच्या अग्नीत दुष्ट प्रवृत्तींचा नाश होतो आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी राख व धूळ लावून ''अहंकाराचे दहन'' झाल्याचे प्रतीक मानले जाते. पौराणिक कथेनुसार प्रह्लादच्या भक्तीसमोर होलिकाचा पराभव झाला, याचे स्मरण म्हणून होळी साजरी केली जाते. धुलीवंदनाच्या दिवशी रंग उधळत वाद-विवाद विसरून समाजात एकोपा आणि बंधुभाव वाढविण्याचा संदेश दिला जातो.

नगर शहरातील विविध भागांतही धुलीवंदन मोठ्या आनंदात पार पडले. काही ठिकाणी नागरिकांनी सेंद्रिय रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश दिला. एकमेकांना शुभेच्छा देत ''रंगपंचमी''पर्यंत चालणाऱ्या या रंगोत्सवाची सुरुवात उत्साहात झाली असून, शहरात सर्वत्र आनंद, उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचे चित्र पाहायला मिळाले.

# नेवासाचा तिसरी डोळा अंध; ४८ लाख खर्चूनही शहर गुन्हेगारांच्या हवाली, प्रशासन सुस्त की तस्करीला साथ?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा शहराची सुरक्षा आणि गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी लाखो रुपये खर्च करून उभारलेले सीसीटीव्ही () नेटवर्क गेल्या दीड वर्षांपासून डेड अवस्थेत आहे. जनतेचा पैसातून उभा राहिलेला हा सुरक्षा कवच आता केवळ शोभेची वस्तू बनला आहे. हे नेटवर्क तांत्रिक बिघाडामुळे बंद आहे की गुन्हेगारांना अभय देण्यासाठी जाणीवपूर्वक बंद ठेवले आहे? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाच्या वादात सुरक्षावाऱ्यावर नेवासा नगरपंचायतीने शहराच्या सुरक्षेसाठी ६ जुलै २०२२ रोजी ४८ लाख ८२ हजार ९९१ रुपयांची निविदा काढून सीसीटीव्ही बसवण्याचे काम हाती घेतले होते. ६ फेब्रुवारी २०२३ पर्यंत शहरातील २७ मुख्य ठिकाणांवर ७८ कॅमेरे बसवण्यात आले, ज्यात ५ फिरते () कॅमेरे आणि ६० हजार मीटर केबलचा समावेश होता. नियमानुसार, संबंधित कंपनीने एक वर्ष देखभाल केली. त्यानंतर या यंत्रणेच्या देखभालीची जबाबदारी नेवासा पोलीस स्टेशनकडे सोपवण्यात आली होती. मात्र, आता पोलीस प्रशासन ''आमच्याकडे देखभालीसाठी निधी नाही'' असे सांगून हात वर करत आहे, तर दुसरीकडे नगरपंचायत अजूनही या प्रकल्पाची बिले भरत आहे.

वाळू तस्करीसाठी डेलिब्रेट शटडाऊन? नेवासा परिसरात सध्या अवैध वाळू उपसा आणि तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. रात्रीच्या वेळी वाळूने भरलेले शेकडो ट्रक शहरातून सुसाट धावत असतात. या तस्करांवर कारवाई करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजचा मोठा आधार मिळाला असता. मात्र, नेमके वाळू तस्करीच्या मार्गावरील कॅमेरे बंद असल्याने ही यंत्रणा वाळू माफियांच्या फायद्यासाठी तर बंद ठेवली नाही ना? अशी दाट शंका व्यक्त केली जात आहे. ठोस पुरावे नष्ट करण्यासाठीच ही डिजिटल डोळेझाक केली जात असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.





**''आम्ही ४५ लाखांहून अधिक खर्च करून शहरात सीसीटीव्ही बसवले आणि देखभालीची जबाबदारी पोलीस विभागाकडे दिली होती. नगरपंचायत आजही या कॅमेऱ्यांची बिले भरत आहे, परंतु पोलीस विभागाने देखभाल न केल्यामुळे गेल्या दीड वर्षांपासून ही यंत्रणा बंद पडली आहे.''**

**करण सिंह घुले (नगराध्यक्ष, नगरपंचायत नेवासा)**

**नेवासाकरांचा सवाल: जबाबदार कोण ?**

**अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या नेवासा शहरात वर्दळीच्या महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बंद असणे ही गंभीर बाब आहे. गुन्हेगारांना मोकळे रान मिळत असताना प्रशासन मात्र टोलवाटोलवी करत आहे. आता वरिष्ठ पातळीवर या प्रकरणाची चौकशी होण्याची मागणी होत आहे**

# 'राजदेवांसारखे सारखे कार्यकर्ते प्रत्येक गावात हवेत!'

**खा. नीलेश लंके यांची अपेक्षा । वाढदिवसानिमित्त रक्तदान, नेत्रतपासणी व वृद्धांना काठ्यांचे वाटप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** ''प्रत्येक गावात रविंद्र राजदेव यांच्यासारखा कार्यकर्ता उभा राहिला, तर तालुक्यात आरोग्य, शिक्षण आणि सर्वसामान्यांचा एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही,'' असे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले. नांदूरपठारचे माजी सरपंच रविंद्र राजदेव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर, डोळे तपासणी शिबिर आणि वृद्धांना काठ्यांचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी पारनेरच्या नगराध्यक्ष विद्याताई कावरे ,उपनगराध्यक्ष सुप्रियाताई शिंदे ,पंचायत समिती सदस्य जुन्नर शांताराम दाते,नांदूर पठार सेवा सोसायटी चे व्हा.चेअरमन बाळू चौधरी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी दीपक लंके ,राणीताई लंके ,मोहनराव रोकडे ,अशोक घुले ,किरण ठुबे ,प्रसाद नवले , महेंद्र गायकवाड, दिनेश चौगुले ,पोपटराव गुंड ,बाळासाहेब गुंड ,दिपालीताई औटी ,सारिकाताई आग्रे ,प्रकाश चिकने,गंगाराम चिकने,पांडुरंग येवले , अर्जुन भालेकर ,योगेश मते , डॉ बाळासाहेब कावरे , बाळासाहेब पुंडे ,बापूसाहेब ठुबे, अजित भाईक, हरिभाऊ आहेर ,नारायण राजदेव , भानुदास आग्रे ,जयराम चौधरी ,दिनेश आग्रे ,मदन देशमाने ,दत्ता चौधरी गटातील सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सोनिया राजदेव यांनी तर आभार रविंद्र राजदेव यांनी मानले.

**सामाजिक उपक्रमांची जोड**

वाढदिवस म्हटला की डीजे, फटाके आणि बॅनरबाजी अशी परंपरा रूढ झाली आहे. मात्र राजदेव यांनी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी आणि वयोवृद्धांना आधारासाठी काठ्यांचे वाटप करून समाजोपयोगी संदेश दिला. ''येथे संकलित होणाऱ्या एका रक्तपिशवीमुळे एक जीव वाचतो, त्याचे कुटुंब वाचते,'' असे सांगत खा. लंके यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

**आरोग्य, शिक्षणासाठी मदत आवश्यक**

''एखाद्या व्यक्तीला सामान्य मदत आठ दिवसांनी दिली तरी चालते; मात्र वैद्यकीय उपचारासाठी मदत तात्काळ लागते. आरोग्य आणि शिक्षणासाठी विलंब चालत नाही,'' असे स्पष्ट करत त्यांनी राजदेव यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.

# होळीच्या पावन पर्वावर नवी पेठेतील श्रीराम मंदिरात ३१ दिवसीय श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्याला भक्तिभावात प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** होळीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून नवी पेठ येथील श्रीराम मंदिर, नवी पेठ येथे सोमवार, २ मार्च रोजी रात्री आठ वाजता ३१ दिवसीय श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचा अत्यंत भक्तिमय वातावरणात शुभारंभ झाला. श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

त्यानंतर महा हनुमान चालीसा पठणास प्रारंभ झाला. शेकडो भाविकांनी एकाच सुरात हनुमान चालीसेचे पठण करत परिसरात अध्यात्मिक ऊर्जा निर्माण केली. ''श्रीराम जय राम जय जय राम'' या तारक मंत्राच्या संगीतमय सामूहिक जपाने कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

होली खेलेंगे', 'होली खेलें खेलेंग होळीच्या निमित्ताने प्रभू श्रीराम व हनुमान यांच्या भक्तिरंगात रंगलेली ही भजने उपस्थितांना मंत्रमुग्ध करून गेली. आधी काही निवडक भजने सादर करून त्यानंतर सामूहिक गजर करण्यात आला.

गेली १९ वर्षे अखंडपणे श्रीराम व हनुमान जन्मोत्सव भक्तिभावाने साजरा करण्याची परंपरा मंडळाने जपली आहे. यावर्षी प्रथमच महा हनुमान चालीसा पठणासोबत तारक मंत्राचा संगीतमय जप आयोजित करण्यात आल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. प्रत्येक घराघरांत व प्रत्येकांच्या मुखातून श्रीराम स्तुती व हनुमान चालीसा घुमावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमादरम्यान मोफत हनुमान चालीसा पुस्तिकांचे वाटपही करण्यात आले. सलग ३१ दिवस दररोज रात्री ८ ते १० या वेळेत नगर शहरातील विविध सार्वजनिक मंडळे व ट्रस्ट यांच्या माध्यमातून सामूहिक महा हनुमान चालीसा पठण व भजन संध्या आयोजित करण्यात येणार आहे. रोजच्या कार्यक्रमाच्या शेवटी श्रीरामचरितमानस मधील निवडक चौपाईचे वाचन करण्यात येते.





# मनपा महापौर व उपमहापौर यांनी घेतली उद्यान विभागाची बैठक

**महिन्याभरात उद्यान विभागाच्या कामगिरीत बदल दिसला पाहिजे – महापौर ज्योतीताई गाडे । उद्यान स्वच्छता अभियान राबविण्याच्या सूचनांबरोबरच विभागातील अडचणींवर उपाययोजना करण्याचा निर्धार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची बैठक महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.या बैठकीत शहरातील सर्व उद्यानांची सद्यस्थिती, स्वच्छतेची कामे, महापुरुषांच्या पुतळ्यांची देखभाल, तसेच नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी बैठकीत स्पष्ट निर्देश दिले की, उद्यान विभाग हा शहराच्या सौंदर्याशी थेट संबंधित आहे. त्यामुळे उद्यानातील स्वच्छता, आणि नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा यामध्ये सुधारणा दिसली पाहिजे. महिन्याभरात उद्यान विभागाच्या कामगिरीत लक्षणीय बदल झाला पाहिजे.

प्रत्येक उद्यान स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक असले पाहिजे. हेच नगरकरांप्रती आपले उत्तरदायित्व आहे. त्यांनी पुढे सांगितले की, महापुरुषांच्या पुतळ्यांची नियमित स्वच्छता, फुलझाडांचे संवर्धन आणि मनोरंजनासाठी आवश्यक साधनसामग्री पुरवणे आवश्यक आहे.

उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असली तरी नियोजनशीर पद्धतीने काम केल्यास परिणाम निश्चितच दिसून येतील.

शहरात 'उद्यान स्वच्छता अभियान' राबविण्याचे आदेश देत असून, या अभियानात नागरिकांनी देखील सहभाग घ्यावा. नगरकर आणि प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच शहर सुंदर बनू शकते.

बैठकीत बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, उद्यान विभागाच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आज ही बैठक आयोजित केली आहे. विभागातील अडचणी समजून घेतल्या असून त्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्यात येतील. उद्यान विभागाला आवश्यक साहित्य, साधनसामग्री पुरवली जाईल. मात्र, विभागाने देखील आपल्या कामगिरीत गुणवत्ता दाखवावी. महापालिकेतील प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडल्यास शहरातील प्रत्येक उद्यान नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरेल.

बैठकीदरम्यान उद्यान विभागाचे प्रमुख शशिकांत नजन आणि आस्थापना विभाग प्रमुख गणेश लईचट्टी यांनी विभागातील सध्याच्या परिस्थितीची माहिती दिली. शहरातील उद्याने अधिक सुंदर व सुरक्षित बनवण्यासाठी नियमित स्वच्छता, फुलझाडांची देखभाल, झाडांवर पाण्याची व्यवस्था, तुटलेली बाके व उपकरणे दुरुस्त करणे यासारख्या उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.

**दैनिक आकर्षण वृत्तपत्राच्या मालकी आणि इतर तपशिलासंबंधीचे निवेदन (वृत्तपत्र नोंदणी कायदा १९५६ च्या मध्यवर्ती नियमवलीनुसार फार्म – ८ अंतर्गत)**

| | |
|---|---|
| १) वृत्तपत्राच्या प्रसिद्धीचे ठिकाण : | प्लॉट नं. ९२ भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर पिन – ४१४००३ (महाराष्ट्र राज्य) |
| २) प्रसिध्दीचा कालावधी : | दैनिक (सायंकाळी) |
| ३) मुद्रकांचे नाव : | विजय शामराव सांगळे |
| नागरिकत्व : | भारतीय |
| पत्ता : | विराज मुद्रणालय प्लॉट नं. ९२ भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) |
| ४) प्रकाशकाचे नाव | विजय शामराव सांगळे |
| नागरिकत्व | भारतीय |
| | प्लॉट नं. ९२ भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर |
| ५) संपादकाचे नाव | विजय शामराव सांगळे |
| नागरिकत्व | भारतीय |
| | प्लॉट नं. ९२ भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर |
| ६) वृत्तपत्राच्या मालकी हक्कांमध्ये एक टक्क्याहून अधिक मालकी असलेल्या भागिदारी किंवा भागधारकांची नावे | विजय शामराव सांगळे |
| भागधारकांचा पत्ता | प्लॉट नं. ९२ भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर |

**मी विजय शामराव सांगळे असे जाहीर करतो की, वरील तपशिल माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.**

**०३ मार्च २०२६**

**विजय शामराव सांगळे**
**मालक/ मुद्रक/ प्रकाशक/ संपादक**